अधिसूचना

क्र. - ०८/२०२४ दिनांक - १.२.२०२४

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ..... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशनाबाबत

संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१८, दि. १३.४.२०१८
२) असाधारण अधिसूचना क्र. ३५/२०१९, दि. १६.४.२०१९
३) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२०, दि. २०.४.२०२०
४) अधिसूचना क्र. ४/२०२१, दि. ७.१.२०२१
५) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२१, दि. १६.४.२०२१
६) असाधारण अधिसचूना क्र. ५३/२०२१, दि. २.६.२०२१
७) असाधारण अधिसूचना क्र. ९२/२०२१, दि. ४.१०.२०२१
८) असाधारण अधिसूचना क्र. १७/२०२३, दि. ६.२.२०२३
९) असाधारण अधिसूचना क्र. २११/२०२३, दि. २९.१२.२०२३

संदर्भीय क्र. १) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून अधिसूचनेतील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांकरिता अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले होते.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, संदर्भीय क्र. ४ व ५ वरील अधिसूचनेच्या माध्यमातून अधिसूचनेमध्ये वरील उल्लेखित विद्याशाखांचे तदर्थ अधिष्ठाते, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) चे कलम १५(३) च्या परंतुकाअंतर्गत तत्कालीन हंगामी कुलगुरूंनी, संदर्भीय क्र. ९ वरील अधिसूचनेद्वारे सदर्हू विद्याशाखांच्या शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून नवीन नामनिर्देशन होईपर्यंत अथवा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत कायम ठेवण्याला मान्यता दिली होती. आता विद्यापीठाला नियमित कुलगुरू लाभले आहेत. दिनांक २५.१.२०२४ रोजी नवनियुक्त कुलगुरूंनी, कुलगुरू पदाचा कार्यभार स्विकारला असून त्यांनी कायदा कलम १५(३) अंतर्गत, सदर्हू नामनिर्देशित प्राध्यापकांना, अधिष्ठाता पदाची जबाबदारी पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवण्याला मान्यता दिली आहे.

स्वा/-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****